केस नं. रेफरन्स आयडीए नं. 45/2018
निशाणी यु–176

**<u>व्दितीयपक्षातर्फे साक्षीदार क. 2 ची साक्ष</u>**
**<u>शपथेवर साक्षीदाराची पुढील सरतपासणी – श्री.बी. आर. कावरे यांच्याव्दारा</u>**

**01.** मी निशाणी यु–176 वर माझे पुराव्याचे शपथपत्र दाखल केलेले असुन त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे, त्यावर माझी सही आहे. मी अभिलेखावर यादी निशाणी यु–12 सोबत अनुक्रमाक 899 ते 908 वर माझ्या खात्याचा उतारा दाखल केला आहे. (सदर दस्तांना निशाणी क्रमांक देण्यास प्रथमपक्षाच्या वकीलांनी हरकत घ ेतली. त्यांच्या कथनानुसार सदर दस्त साक्षीदाराने तयार केलेले नाहीत, त्यावर त्याच्या सहया नाहीत, त्यामुळे त्यांना निशाणी क्रमांक दिला जावु शकत नाही.) हरकत कायम ठेवुन सदर दस्तांना निशाणी क्रमांक **<u>यु–213</u>** देण्यात आले.
सरतपास – पुर्ण...

**<u>उलटतपास – प्रथमपक्षातर्फे विधीज्ञ श्री. पी.एल.शहाणे यांचेव्दारा</u>**

02. ज्या जाहीरातीला अनुसरुन मी नियुक्तीकरीता अर्ज दाखल केला होता ती जाहिरात मी दाखल केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, बॅंकेने संदेशवाहक यापदासाठी कुठलीही जाहिरात वृत्तपत्रात प्रसिध्द केली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मला मुलाखतीकरीता बोलाविण्यात आले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी बनावट मुलाखतीचे पत्र दाखल केलेले आहे. संदेशवाहक या पदाचे कामाचे तास निश्चीत आहेत की नाही ते मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, कायम कर्मचारी ज्या दिवशी रजेवर राहायचे त्यावेळेसच मला कामावर बोलाविले जात होते. हे म्हणणे खरे आहे की, मी ज्या दिवशी कामावर जायचो त्या दिवसाचा पगार मला मिळायचा. हे म्हणणे खरे नाही की, बॅंकेने निवड समितीचे गठन केलेले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, निवड समितीच्या अधिका–यांची नावे व पद मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, निवड समितीबाबत खोटा मजकूर मी माझ्या पुराव्याच्या शपथपत्रात नमूद केलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, बॅंकेने माझी नियुक्ती चतुर्थश्रेणी कर्मचारी म्हणुन केलेली नाही, साक्षीदार सांगतो की, संदेशवाहक म्हणुन नेमणुक केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी परिच्छेद क्र.4 मधील मजकूर खोटा लिहीला आहे.

03. माझे शिक्षण 12 व्या वर्गापर्यन्त झालेले आहे. शपथपत्रातील मजकूर मी माझ्या वकीलांना सांगीतला होता, त्यांनी तो तयार केला व त्यावर मी सही केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, शपथपत्रातील मजकूर मला समजावुन सांगण्यात आला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मी निशाणी यु–213 वर खोटे खातेउतारा केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, बॅंकेच्या विलीनीकरणानंतर कार्यरत असलेल्या कर्मचा–यांना

नविन बॅकेत त्याच पदावर समायोजन करण्याची तरतूद नाही. समायोजन म्हणजे काय ते मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, दि.25.03.2008 चीं अधिसुचना रोजंदारी कर्मचा–यांना लागू नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझी 240 दिवसाची अखंड सेवा झाल्याचे मीं खोटे कथन केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, 240 दिवस सेवा झाल्याबाबतचा पुरावा मी सादर केलेला नाही. बॅकेने काढलेले परिपत्रक, ठराव यांचा उल्लेख मी परिच्छेद क्र.2 मध्ये केला आहे, परंतु त्याच्या तारखा मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी या प्रकरणात खोटे दस्तऐवज दाखल केलेले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी बॅकेच्या अटी पुर्ण करत नसल्यामुळे कायम कर्मचारी म्हणुन मला नियुक्ती देता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, माइया कामाचे स्वरुप हे कायमस्वरुपी कामगाराप्रमाणे आहे असे मी खोटे सांगत आहे.

04. सन 2018 मध्ये मी सातारा शाखा, ता.जि.औरंगाबाद शाखेत कार्यरत होतो. हे म्हणणे खरे नाही की, मी स्टेटमेंट ऑफ क्लेम सोबत खोटे परिशिष्ठ–1 व परिशिष्ठ–7 दाखल केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी चतुर्थश्रेणी कर्मचा–याप्रमाणे काम करत नाही. हे म्हणणे खरे नाही की, वर्ग–4 च्या कर्मचा–यांचे काम व माझे काम यात फरक आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी परिच्छेद क्र.4 मध्ये बॅकेविरुध्द खोटे आरोप केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे शपथपत्र दाखल केलेले आहे.

उलटतपास – पुर्ण...

फेरतपास – नाही.

**श्रवणोत्तर स्विकृत**

सही/–

दिनांकः 24.07.2023
ठिकाणः औरंगाबाद

(एस.एस.सहस्त्रबुध्दे)
न्यायाधीश,
2रे कामगार न्यायालय क्रं.2, औरंगाबाद.